जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -३५ दिनांक - १३/०१/२०२४**

सहकारनगर पोलीस स्टेशन

# दुचाकी चालवण्याच्या हौसेसाठी वाहन चोरी करणा-या २ विधीसंघर्षित बालकाकडुन रु १,१०,०० किंमतीच्या ३ दुचाकी हस्तगत

दि.११/०१/२०२४ सहकारनगर पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे वाहन चोरी, गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग व गुन्हेगार चेकिंग करीत असताना सहकारनगर पोलीस स्टेशनचे हददीतील शंकर महाराज मठ भागात दर्शनासाठी येणा-या भावीकांच्या दुचाकी लावण्यासाठी पार्कींगची सोय करण्यात आली होती. त्या पार्कींगमधुन दुचाकी चोरी होवु नये यासाठी सदर भागात तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सापळा रचला असता दोन मुले त्यांचेकडील हिरो होंडा स्प्लेंडर गाडी नं.MH-13-AS-9144 ही घेवुन सदर ठिकाणी आले व त्यांनी त्यांची गाडी महेंद्रा शोरुमचे इमारती समोर पार्क करुन ते बर्गर किंग समोरील पार्किंग जागेत आले व तेथे पार्क केलेल्या दुस-या दुचाकी वाहनांना त्यांचेकडील चावी लावुन हॅण्डल लॉक काढण्याचा प्रयत्न करु लागले. त्यांचा पोलीस स्टाफला संशय आल्याने सर्वांनी एकमेकांना इशारा करुन दोन्ही मुलांना त्यांचेकडील गाडीसह ताब्यात घेवुन त्यांना गाडीबाबत व तीचे कागदपत्रांबाबत विचारता ते उडवा उडवीची उत्तरे देवुन लागल्याने त्यांना त्यांचे ताब्यातील गाडीसह सहकारनगर पोलीस स्टेशन येथे घेवुन आलो व त्यांचे पालकांना संपर्क करुन पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेतले.

त्यांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी त्यांचेकडील गाडी चोरीची असल्याची कबुली देवुन मागील तीन चार दिवसापुर्वी आम्ही दोघांनी बर्गर किंग या दुकाना समोरून आणखी दोन दुचाकी आमचे कडील चावीने चोरी करुन इकडे तिकडे फिरवुन मौजमजा करुन त्या के.के.मार्केटचे पलीकडे असलेल्या लोअर इंदीरानगर बिबवेवाडी भागातील नाल्याजवळ पार्क करून ठेवल्या आहेत. असे सांगितल्याने त्यांचेकडुन एकुण १,१०,००० रूपये किंमतीच्या एकुण ०३ दुचाकी गाडया हस्तगत करण्यात आल्या असुन सहकारनगर पोलीस स्टेशन कडील **१)गुन्हा रजि.नं.१०/२०२४ भादवी. कलम ३७९ २)गुन्हा रजि.नं.११/२०२४ भादवी. कलम ३७९ ३) गुन्हा रजि.नं.१२/२०२४ भादवी. कलम ३७९** असे एकुण तीन गुन्हे उघड करण्यात आले आहेत.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील , मा. सहा.पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग श्री.नारायण शिरगावकर , वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुरेंद्र माळाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.संदीप देशमाने सहकारनगर पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राहुल खंडाळे, सहा.पोउपनिरी बापु खुटवड, पोलीस अंमलदार अमोल पवार, निलेश शिवतारे, बजरंग पवार, सुशांत फरांदे, भुजंग इंगळे, महेश मंडलिक, नवनाथ शिंदे, विशाल वाघ, सागर कुंभार, यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
फोन : ०२०-२४२२८११३ / २४२२६६०४
सहकारनगर पोलिस ठाणे
पुणे शहर
POLICE
MH 14 AG 8619